**<u>नियमित दिवाणी दावा क्र.६७/२०२२ मधील नि.३९ वरील आदेश</u>**

(अब्दुल समद वि. शेख रोशन)

(CNR MHWS08000876-2022)

वादीने सदर अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दुरुस्तीसाठी केलेला आहे.

२. वादीचे कथन असे की, सदरहु प्रकरणात प्रतिवादी क्र.५ चे नाव सुधिर कन्हैया एंगड असे असुन नजर चुकीने व टायपिंग चुकीने कन्हैया सुधिर एंगड असे झालेले आहे. सदर चुक हि जाणीव पुर्वक झालेली नाही. अशा परिस्थितीत मुळ दाव्यात प्रतिवादी क्र.५ चे नावामध्ये व दावा नकाशा नावामध्ये खालील प्रमाणे वादी दुरूस्ती करू इच्छीतो. अशा परिस्थीतीत अर्ज मंजुर होण्याची विनंती केली.

३. प्रतिवादी यांचे वकिलाने सदर अर्जावर त्यांचे म्हणणे देवून अर्जास हरकत घेतली व प्रतिवादीचा अर्ज खर्चासह खारीज होण्याची मागणी केली आहे.

४. खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होतात ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे —

| | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १. | प्रस्तावित दुरुस्ती ही पक्षकारामधील वादाचे निराकरण होणेसाठी महत्वाचे आहे का? | होकारार्थी |
| २. | आदेश? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मि मा ंसा.</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ व २</u>**

५. वादी प्रतिवादीच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला. वादीचे कथन असे की, सदर दुरूस्ती ही नजर चुकीमुळे व टायपिंग चुकीमुळे प्रतिवादी क्र.५ चे नाव **'कन्हैया सुधिर एंगड'** असे टाइप करण्यात आलेला आहे. त्याठिकाणी, प्रतिवादी क्र.५ चे नाव '**सुधिर कन्हैया एंगड**' होणे आवश्यक आहे.

६. प्रतिवादी क्र.५ चे नाव सुधिर कन्हैया एंगड हे नाव लिहिण्यास परवानगी दिली तर दाव्याचे स्वरूपात बदल होणार नाही अगर प्रतिवादीचे हक्कावर कोणताही परिणाम होणार नाही. सदर शब्द टंकलेखनाच्या चुकीमुळे झाल्याचे दिसून येते. सबब, प्रस्तावित दुरूस्ती ही दोन्ही पक्षकारांमधील वादाचे निराकरण करण्यासाठी महत्वाची दिसून येते. टंकलेखनाची चुक असल्याने वादीने प्रतिवादीस खर्च देण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी दिले आहे. सबब, मुद्दा क्रमांक २ करीता खालील आदेश करण्यात येते आहे.

## <u>आदेश</u>

१. वादीचा निशाणी ३९ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने सदर दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत करुन घ्यावी.

सहि/—

(श्रीमती पी.एम. कांबळे)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश
क. स्तर, रिसोड.

दिनांकः— ०८/०१/२०२४

Certificate

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Clerk | :- | P. P. Sonune Sr. Clerk |
| Court | :- | $2^{nd}$ Jt. Civil Court, J.D.,Risod. |
| Date:- | :- | 08.01.2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | :- | 08.01.2024 |
| Judgment/Order uploaded on | :- | 08.01.2024 |